नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४६ Issue - 246 | वार बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ Blow- Wednesday Date 22 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दावोसमध्ये ४,९९,३२१ कोटींचे सामंजस्य करार

## महाराष्ट्राच्या विकासाला मोठा बूस्ट देणारा करार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ९२ हजार २३५ इतकी होणार रोजगारनिर्मिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दावोस : दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे काल रात्री उदघाटन झाल्यानंतर आज पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात विक्रमी ४ लाख ९९ हजार ३२१ कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले आहेत.

यातून सुमारे ९२,२३५ इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. यातील एकच करार ३ लाख कोटींचा असून हा जेएसडब्ल्यू यांच्यासोबत करण्यात आला असून, तो स्टील, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम-आयर्न बॅटरिज, सोलर वेफर आणि सेल मॉड्युल्स इत्यादी क्षेत्रात करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या विकासाला मोठा बूस्ट देणारा हा करार असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत याबद्दल 'जेएसडब्ल्यू'चे सज्जन जिंदाल यांचे आभार मानले आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक दिवस आहे. दावोसमध्ये बाहेर बर्फ पडतो आहे. पण, येथे आतमध्ये गुंतवणुकीचा ओघ येत असल्याने गर्मी आहे, असे सांगताना जिंदाल म्हणाले, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'ची प्रक्रिया अतिशय वेगवान आणि तितकीच सहजसोपी प्रक्रिया



आहे. गुंतवणूकदारांच्या बाहेर मोठ्या रांगा लागल्या आहेत. महाराष्ट्रात एकदा याल तर पुन्हा तुम्ही बाहेर जाणार नाही, असे मी त्यांना सांगितले, असे सज्जन जिंदाल यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, आज दावोसमध्ये पहिला करार हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, त्याप्रमाणे राज्यातील शेवटच्या नाही, तर पहिला जिल्हा असलेल्या गडचिरोलीसाठी झाला. कल्याणी समूहासोबत संरक्षण, स्टील, ईव्ही क्षेत्रासाठी हा करार झाला. यात गुंतवणूक ५२०० कोटी रुपयांची असून ४००० रोजगार निर्मिती होणार आहे.

आज झालेले सामंजस्य करार हे कल्याणी समूह, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बालासोर अलॉय लि., विराज प्रोफाईल्स प्रा. लि., एबी इनबेव, जेएसडब्ल्यू, वारी एनर्जी, टेम्बो, एलमाँट, ब्लॅकस्टोन आणि पंचशील रियालिटी, अवनी पॉवर बॅटरिज, जेन्सॉल, बिसलरी इंटरनॅशनल, एच टू पॉवर, झेड आर टू, ब्ल्यू एनर्जी मोटर्स, इस्सार, बुक माय शो, वेल्स्पून इत्यादी कंपन्यांचा समावेश असून, लॉजिस्टिक, ऑटोमोबाईल्स, स्टील, इलेक्ट्रॉनिक्स, आयटी, पायाभूत सुविधा, करमणूक, हरित ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन आदी क्षेत्रातील हे करार आहेत.यातील एक करार फ्युएल अर्थात फ्रेंडस युनियन फॉर एनर्जायझिंग लाईव्हज यांच्याशी करण्यात आला असून, ते महाराष्ट्रातील ५००० युवकांना आर्टिफिशियल इंटिलिजन्स, डिजिटल मार्केटिंग आणि बिझनेस ॲनालिटिक्स या क्षेत्रात प्रशिक्षित करणार आहेत. फ्युएल स्किलटेक युनिव्हर्सिटी पुण्यात स्थापन करण्याचा मनोदय सुद्धा त्यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात...

### तुर्कीतील स्की रिसॉर्ट हॉटेलला भीषण आग! ६६ जणांचा मृत्यू, ५१ जण जखमी

नवी दिल्ली : उत्तर तुर्कस्तानमध्ये एका स्की रिसॉर्ट हॉटेलला मंगळवारी लागलेल्या आगीत किमान ६६ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ५१ जण झकमी देखील झाले आहेत, तुर्कीचे अंतर्गत विभागाचे मंत्री अली येरलीकाया यांनी याबद्दल माहिती दिली आहे. आम्ही अत्यंत दुखात आहोत. या हॉटेलला लागलेल्या आगीत दुर्दैवाने आम्ही ६६ जीव गमावले आहेत, अशी प्रतिक्रिया येरलिकाया यांनी बोलू प्रांतातील कार्तालकाया येथील आग लागलेल्या ग्रँड कार्टल हॉटेलची पाहाणी केल्यानंतर दिली. तर आरोग्य मंत्री कमाल चशाळेर्श्री यांनी जखमी असलेल्यांपैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले. पहाटे साडे तीनच्या सुमारास ११ मजली ग्रँड कार्टल हॉटेलच्या रेस्टॉरंट असलेल्या मजल्यावर ही भीषण आग लागली. मात्र आगीच्या कारणांचा शोध घेतला जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. हॉटेलला आग लागल्यानंतर इमारतीतून जीव वाचवण्यासाठी बाहेर उडी घेतल्याने दोघांचा मृत्यू झाल्याचे गव्हर्नर अब्दूलाझीझ आयदीन यांनी सांगितले.

# न्या. आलोक आराधे यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या.आलोक आराधे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली.

राजभवन येथे मंगळवारी (दि. २१) झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्या. आलोक आराधे यांना पदाची शपथ दिली.

शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी न्या. आराधे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

शपथविधी सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा तसेच मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश उपस्थित होते.

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी न्या. आलोक आराधे यांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारची अधिसूचना वाचून दाखवली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली आणि राष्ट्रगीताने




कार्यक्रमाची सांगता झाली.

**न्या. आलोक आराधे यांचा जीवन परिचय**


न्या. आलोक अराधे यांचा जन्म १३ एप्रिल १९६४ रोजी रायपूर, छत्तीसगड येथे झाला. त्यांनी १२ जुलै १९८८ रोजी वकील म्हणून नोंदणी केली. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या जबलपूर खंडपीठात त्यांनी नागरी आणि घटनात्मक प्रकरणांवर काम केले. एप्रिल २००७ मध्ये त्यांची वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती झाली. २९ डिसेंबर २००९ रोजी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश व १५ फेब्रुवारी २०११ रोजी ते कायम स्वरूपी न्यायाधीश झाले. न्या आराधे २० सप्टेंबर २०१६ रोजी जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले आणि ११ मे २०१८ रोजी हंगामी मुख्य न्यायमूर्ती झाले. १७ नोव्हेंबर २०१८ रोजी त्यांची कर्नाटक उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती. ३ जुलै २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२ त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात हंगामी मुख्य न्यायमूर्ती म्हणून काम पहिले. दिनांक १९ जुलै २०२३ रोजी त्यांची तेलंगाणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदावर नियुक्ती करण्यात आली.

न्या. आलोक अराधे यांनी मध्यस्थी व सामंजस्य केंद्रे, न्यायिक अकादमी, तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरणांमध्ये नेतृत्व केले आहे. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी न्यायव्यवस्थेच्या विविध अंगांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

# छत्तीसगड-ओडिशा सीमेवर चकमकीत १४ नक्षलवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गडचिरोली : छत्तीसगड-ओडिशा सीमेवर मंगळवारी सकाळी झालेल्या चकमकीत १४ नक्षलवाद्यांना ठार करण्यात छत्तीसगड पोलिसांना यश आले. मृत नक्षलवाद्यांमध्ये ओडिशा राज्याचा प्रभारी, केंद्रीय समिती सदस्य जयराम ऊर्फ चलपती याचा समावेश असून त्याच्यावर विविध राज्यांमध्ये एक कोटीपेक्षा अधिकचे बक्षीस होते. मिलिंद तेलतुंबडेनंतर चकमकीत ठार झालेला जयराम हा दुसरा केंद्रीय समिती सदस्य आहे. अजूनही चकमक सुरू असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.



छत्तीसगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळच्या सुमारास छत्तीसगड-ओडिशा सीमेवरील गरियाबंद जिल्ह्यातील मैनपूर कुल्हाडीघाट जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. यावरून त्या भागात एक हजारहून अधिक सुरक्षा जवानांनी नक्षलविरोधी अभियान राबावले. दरम्यान, जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. सुरक्षा जवानांनीदेखील प्रत्युत्तर दिले.

# सांगलीत नशेसाठीची इंजेक्शन, गोळ्यांचा साठा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : नशेच्या वापरासाठी करण्यात आलेला सुमारे सहा लाखांचा औषधी इंजेक्शन, गोळ्यांचा साठा मिरज व सांगलीत जप्त करण्यात आला आहे. नशेबाजांसाठी चढ्या दराने विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तिघांना पोलिसांनी गजाआड केल्याची माहिती पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी मंगळवारी पत्रकार बैठकीत दिली. जिल्ह्यात आजपर्यंतची सर्वांत मोठी ही कारवाई असल्याचे सांगण्यात आले.

सांगली व मिरज शहरात नशेबाज तरुणांकडून अंमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याच्या तक्रारी असून, या नशेत काही हाणामारीच्या घटनाही घडल्या आहेत. याची दखल घेत अधीक्षक घुगे, अतिरिक्त अधीक्षक रितू खोकर, उप अधीक्षक प्रणिल गिल्डा यांनी या अवैध व्यवहाराची पाळेमुळे शोधून कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

## गर्भ-लिंग प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा
## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

# स्तन व गर्भाशयमुख कर्करोग निदानासाठी तपासणी मोहीम राबवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यामध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. यामध्ये स्तन व गर्भाशयमुख कर्करोगाचे रुग्ण जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे. या दोन्ही कर्करोगाच्या निदानासाठी राज्यात मोहीम राबविण्यात यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

आर्थिक वर्ष २०२५ - २६ च्या नियोजनासाठी आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत आरोग्य मंत्री आबिटकर बोलत होते. बैठकीस सचिव वीरेंद्र सिंग, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्रीरंगा नायक, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत डांगे, राज्य सेवा हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, सहसंचालक बबीता कमलापुरे आदींसह विविध शाखांचे अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य मंडळाच्या ठिकाणी संदर्भ सेवा रुग्णालये उभारण्याबाबत पुढील वर्षात आर्थिक तरतुदीची मागणी करण्याबाबत सूचना देताना आरोग्य मंत्री म्हणाले, नाशिक व अमरावती येथील संदर्भ सेवा रुग्णालय कार्यान्वित झाली आहे. उर्वरित सर्व ठिकाणी रुग्णालयाच्या उभारणीसाठी जागा शोधून निधीची मागणी करण्यात यावी. मागील आर्थिक वर्ष २०२४ - २५ मध्ये मिळालेला संपूर्ण निधी खर्च करण्यात यावा. याबाबत विहित कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. तसेच कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीमही प्रभावीपणे राबविण्यात यावी.




जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या योजनांची माहिती तसेच तक्रारीच्या अनुषंगाने संपर्क यंत्रणा निर्माण करण्यात यावी. यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची नियुक्ती करावी. या संपर्क यंत्रणेचे केंद्र मुंबईत असावे. महात्मा फुले जन आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध खाटांची माहिती ऑनलाईन पद्धतीने मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही यावेळी मंत्री आबिटकर यांनी दिल्या.

**गर्भ-लिंग प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा**

अवैध गर्भपात प्रकरणी शासन गांभीर्याने कार्यवाही करत असून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपींना कठोर शिक्षा करण्यात येत आहे. तरीही अवैध गर्भपात प्रकरणांमध्ये अधिकाधिक पुराव्याच्या साहाय्याने प्रकरण मजबूत करून आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी कार्यवाही करण्याची गरज आहे. अशा प्रकरणात महिला पुढे येवून माहिती देतात, अशा महिलांचे मानधन वाढविण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत घेण्यात आला. राज्यात गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निर्धारण प्रतिबंधक) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून पोलीस यंत्रणेच्या समन्वयाने अशा प्रकरणावर कारवाया वाढविण्यात याव्यात, अशा सूचनाही आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दिल्या. आरोग्य भवन येथे गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निर्धारण प्रतिबंधक) कायदा (पीसीपीएनडीटी) अंमलबजावणीबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस सचिव विरेंद्र सिंग, आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, संचालक डॉ नितीन अंबाडेकर, सहसंचालक श्रीमती कमलापुरे आदी उपस्थित होते. ऑनलाईन पद्धतीने राज्यातील जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगर पालिकांच्या वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. राज्यात स्त्री - पुरुष लिंग गुणोत्तर प्रमाण सुधारणेसाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. यासोबतच अवैध गर्भपात रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निर्धारण प्रतिबंधक) कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, अवैध गर्भपात प्रकरणात दाखल केसेस जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत शासन विचार करीत आहे. तसेच गर्भपात करण्यात येणाऱ्या गोळ्या सहज उपलब्ध होवू नये, यासाठी काळजी घेण्यात यावी. ऑनलाईन विक्री होत असल्यास याबाबत पडताळणी करून दोर्षीविरुद्ध कारवाई करावी. जिल्हा स्तरावर असलेल्या समित्यांमध्ये सामाजिक कार्यकर्ते, चळवळीतील नागरिकांचा सहभाग करण्यात यावा. या समित्या आणखी सक्षम करण्यात यावी. खबरी बक्षीस योजनेतील बक्षीस वाढविण्याबाबत कार्यवाही करावी.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### ट्रम्पचे धोरण

डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अध्यक्ष बनल्यापासून अमेरिकेलाच प्राधान्य देण्याचे त्यांचे धोरण जगातील अनेक देशांना जाचक ठरू लागले आहे. कॅनडा, चीन, मेक्सिको या देशांना तर त्यांनी लक्ष्य केलेच आहे. पण त्यांची काही धोरणे भारतासाठीही मारक ठरणार हे पहिल्याच दिवशी स्पष्ट झाले. बेकायदा स्थलांतरितांपासून ते भारतीय मालावर करआकारणीपर्यंत अनेक निर्णय भारतासाठी प्रतिकूल ठरणार आहेत. भारत संस्थापक असलेल्या 'ब्रिक्स' राष्ट्रसमूहाने डॉलरला पर्याय म्हणून वेगळे चलन निर्माण केले, तर सर्व सदस्य देशांवर १०० टक्के आयातशुल्क आकारले जाईल, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. निवडणूक जिंकल्यावर लगेचच चीन, मेक्सिको आणि कॅनडातून आयात मालावर अनुक्रमे ६०, २५ आणि २५ टक्के टॅरिफ किंवा शुल्क आकारण्याची घोषणा केली होती. आता ही शुल्क आकारणी इतरही देशांवर लागू केली जाईल, अशी धमकी त्यांनी शपथ घेतल्यानंतरच्या भाषणात दिली. भारत हा सर्वाधिक शुल्क आकारणारा देश आहे, अशी तक्रार त्यांनी काही महिन्यांपूर्वी केली होती. भारत- अमेरिका व्यापारात भारताचे आधिक्य (सरप्लस) आहे. ही बाब ट्रम्प यांच्या नजरेतून निसटण्यासारकी नाही. अमेरिकेत सर्वच देशांकडून आयात होणाऱ्या मालावर सरसकट १० टक्के शुल्क आकारण्याचा ट्रम्प प्रशासनाचा निर्णय भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. भारत सरकार अमेरिकी मालावर अवाजवी शुल्क आकारते अशी ट्रम्प यांची धारणा आहे. हे शुल्क कमी करण्यासाठी भारताला भाग पाडले जाऊ शकते.

# भरधाव वेगाने जाणारा टिप्पर व दूचाकीचा भीषण अपघात; दुचाकीस्वार जागीच ठार

## फुलवळ दत्तगड शेजारील मुख्य रस्त्यावरील घटना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनीधी : कंधार तालुक्यात अवैद्यरित्या रेती भरून भरधाव वेगात जाणाऱ्या विना नंबरच्या टिप्परने दुचाकी चालकास समोरा समोर धडक दिल्यामुळे दुचाकी चालक हा जागीच ठार झाल्याची घटना दि.२० जानेवारी रोज सोमवारी सायंकाळी ४:३० च्या सुमारास बहादरपुरा - फुलवळ दरम्यान (दत्तगड बिजेवाडी फाटा ) असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर दत्तगड शेजारी ही घडली असून, रेती घेऊन जाणारा टिप्परने या ठिकाणाहून पलायन केल्याचे प्रत्यक्ष दर्शनीनी सांगितले आहे.

शिवा रामराव कावलगावे रा. बोरी (बु.) तालुका कंधार येथील रहिवासी असून, ते दि. २० जानेवारी रोज सोमवारी सायंकाळी ४:३० च्या सुमारास दुचाकी क्रमांक एमएच २६ बीएफ ६२०३ वर बसून आपल्या पत्नीसोबत फुलवळ मार्गे कंधारकडे जात असताना बहादरपुरा - फुलवळ रोडवरील दत्तगड बिजेवाडी फाट्यावर अवैध्यरित्या रेती भरून भरधाव जाणाऱ्या विना नंबरच्या टिप्परने दुचाकीस जोराची धडक दिल्यामुळे शिवा रामराव कावलगावे हा जागीच ठार झाला तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे, सदरच्या महिलेस कंधार येथील ग्रामिण रुग्णालय कंधार येथील रुग्णवाहिका व पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधाकर खजे, कोकाटे, पोलीस जमादार बापूराव व्यवहारे, संतोष काळे यांच्यासह पोलीस प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन त्या महिलेस उपचारासाठी कंधार ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असून प्रकृती गंभीर असल्यामुळे तिला उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले.

तरूण मयत शिवा कावलगावे यांचे पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई - वडील, बहिण - भाऊ असा मोठा परिवार आहे. कावलगावे यांच्या अपघाती निधनाची बातमी कळताच बोरी गावावर शोककळा पसरली आहे.

अवैध व विना नंबर प्लेटच्या या मार्गावर धावणाऱ्या टिप्परचा बंदोबस्त करण्यात यावेत अशी मागणी या परिसरातील नागरिक करत आहे .

वृत्त लिहेपर्यंत सदरच्या अपघात प्रकरणातील पलायन केलेल्या टिप्परची चौकशी करून गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती कंधार पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी दिली आहे.



## सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर व शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## पंढरपुरात वाल्मीक कराडच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फाशी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठा समाजाच्या वतीने बापू शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज पंढरीतील आद्य क्रांतिकारक राहोजी भांगरे व्यायाम शाळेसमोर बीड जिल्ह्यातील खंडीच्या पुण्यातील अटक केलेली आरोपी वाल्मीक कराड यांच्या प्रति कात्मक पुतळ्यास फाशी देण्यात आली.

बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मीक कराड वर ३०२ चा गुन्हा दाखल करावा, त्याची पंढरपुरात दोन वाड्या आहेत तसेच राज्यातील इतर बागा देवी कोट्यावधीची माया त्यांना जमा केलीय. त्यांची ही सर्व संपत्ती शासनाने शासन जमा करून घ्यावी. पूजा पद्धतीने सरपंच संतोष यांची क्रूरपणे हत्या केली ती पाहता बीड जिल्ह्यातील वाल्मीक कराड व त्यांची पोचलेली कुख्यात गुंड हे माणसाच्या नावाला कलंक ठरत आहे या सर्वांना तातडीने फाशी देण्यात यावी अशी मागणी यावेळी बापू शिंदे यांनी केली आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कै.अलोक रेवगडे यास मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आमचे पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कै.अलोक संदीप रेवगडे हा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता ७ वीत शिकणारा विद्यार्थी पंतग उडविण्याच्या नादात घराशेजारील विहिरीत तोल जाऊन पडला या प्रसंगी. मित्रांनी आरडाओरडा करून लोकांना मदतीची हाक दिली , जन समुदाय जमा झाला.परंतु विहिरीची खोली अधिक असल्यामुळे मदतीच्या अगोदरच त्याला काळाने कवटाळले, कुटुंबाचा उदरनिर्वाह हातावर असून कुटुंब मोलमजुरीचे काम करत आहे.बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख यांनी शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून त्याच्या कुटुंबीयाना राजीव *गांधी अपघात विमा योजना अंतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जिल्हा परिषद नाशिक कार्यालयाकडून नुकताच १,५०,०००/-(एक लाख पन्नास हजार रुपये) मदतीचा धनादेश कुटुंबाकडे सुपूर्त केला.याकामी शालेय समितीचे सदस्य धनंजय रेवगडे,चेयरमन चंद्रभान रेवगडे, आजोबा पंढरी बाजुनाथ रेवगडे,वडील संदीप रेवगडे, आई मनिषा रेवगडे, ऋषिकेश रेवगडे,अरुण रेवगडे, सोमनाथ शेलार,पोलिस पाटील भाग्यश्री पाटोळे, नवनाथ पालवे,सोपान पाटोळे उपस्थित होते.यांनी शिक्षण विभागाचे व बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयाचे उपशिक्षक टी.के. रेवगडे, बी.आर.चव्हाण,आर. व्ही.निकम,एस.एम.कोटकर,आर. टी.गिरी,एम.एम.शेख,सविता देशमुख,सी.बी.शिंदे, के.डी.गांगुर्डे,एस. डी.पाटोळे,आर.एस.ढोली,ए.बी. थोरे यांचे ऋण व्यक्त केले.



## कोठुरे ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडीचे प्रस्थान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील श्री प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तपोभूमी गोदातटी वसलेले श्री क्षेत्र कोठोरे येथून श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर कडे पायी दिंडीचे प्रस्थान झाले असून बाणेश्वर भगवान यांचे कृपेने संत जनार्दन स्वामी तसेच वै. ह.भ.प. बन्सी महाराज सुरवाडे तसेच कांबळे काका यांचे प्रेरणेने पायी दिंडी सोहळा आयोजित केला जात असून सालाबाद प्रमाणे याही वर्षी टाळ मृदंगाच्या गजरात हरिनामाच्या घोषात या दिंडी सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला, या दिंडीत ठिकठिकाणी नामवंत कीर्तनकारांची कीर्तन प्रवचने होणार असून दि. २५/ १/ २०२५ रोजी त्रंबकेश्वर मुक्कामी ह भ प सीतामाई काळे तर दि. २६ /१/ २०२५ रोजी सकाळी ह भ प राजेंद्रजी महाराज थोरात निफाड यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे ,या दिंडी सोहळ्यासाठी विणेकरी ह भ प माधव बुवा पिठे, सुखदेव चांदोरे तसेच संजय पाटोळे, संजय मोगल, दिलीप मोगल ,अमोल बर्वे व समस्त ग्रामस्थ ,भजनी मंडळ कोठुरे यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे,

## सेलु येथे १२५ वर्षाची परंपरा असलेले वासिष्ट चतुरात्र महासोमयाग लातुर जिल्ह्यात प्रथम यज्ञ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/औसा : औसा तालुक्यातील सेलू येथे २२ जानेवारी ते ३० जानेवारी या दरम्यान वाशिष्ठ चतुरात्र महासोमयाग आयोजित करण्यात आला आहे. या सोमयागाची सेलू येथे जय्यत तयारी करण्यात आली असून यज्ञ सोहळ्याला लातूर जिल्ह्यातील भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन यज्ञ समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

संपूर्ण भारत देशामध्ये १२५ वर्षांची परंपरा आणि तीन पिढ्या कार्यरत असलेले अग्निहोत्री बहुसोमयागजी दीक्षित श्री यज्ञेश्वर रंगनाथ सेलुकर महाराज यांच्या अधिपत्याखाली होत असलेले २९ वे यज्ञ पार पडत आहे. अध्यात्म क्षेत्रामध्ये यज्ञाहूतीला मोठे महत्त्व आहे. या यज्ञामुळे, निसर्गासह मानव जातीला एक ऊर्जा देणारे साधन म्हणजे यज्ञ आहुती आहे.

यज्ञाहुती परंपरेचे वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही अधोरेखित झाले आहे. निसर्ग आणि मानवाच्या महत्त्व कल्याणासाठी महाराज श्रीकृष्ण सेलुकर, यांच्या अधिपत्याखाली १२५ वर्षांपूर्वी एक सोमयाग यज्ञ पार पडला होता. या सोमयागाची परंपरा त्यांचे पुत्र रंगनाथ महाराज यांनी पुढे चालवली. त्यांच्या कार्यकालात तब्बल १५ विविध सोमयाग यज्ञ झाले. त्यानंतर या यज्ञाची परंपरा यज्ञेश्वर महाराज यांनी पुढे चालू ठेवली. त्यांनी आतापर्यंत २८ यज्ञ पार पाडले आहेत. सेलू तालुका औसा हे सेलुकर महाराजांची जन्मभूमी असल्यामुळे यज्ञेश्वर महाराजांच्या पुढाकारातून देशभरामध्ये २८ यज्ञ झाले.परंतु आपल्या जन्मभूमी १ मध्ये एक यज्ञ करण्याचा त्यांचा मानस आणि संकल्प असल्यामुळे त्या संकल्पाची पूर्तता करण्यासाठी सेलु येथे २२ जानेवारी ते २९ जानेवारी या कालावधीमध्ये नऊ दिवसाचा यज्ञ सोहळा पार पडत आहे.

या यज्ञामध्ये २२ जानेवारी रोजी यज्ञ समारंभाचा ध्वजारोहण सोहळा परमपूज्य सच्चिदानंद अभिनव विद्यानरसिंह भारती स्वामीजी शंकराचार्य संकेश्वरपीठ कोल्हापूर, स्वामी श्री रामानंद भारती छत्रपती संभाजीनगर, स्वामी श्री हरीहरानंद भारतीधारूर यांच्या हस्ते - आहे. तर प्रमुख उपस्थीती - म्हणून परम पूज्य माधवानंद सरस्वती स्वामी परमहंस परिव्राजकाचार्य श्री सरस्वती पीठ रंगाम पेठ कर्नाटक तर पंडित श्री गणेश्वर शास्त्री द्रविड श्री क्षेत्र वाराणसी यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे.

तर यज्ञ कार्यकाळामध्ये सामूहिक श्री सूक्त हवन, किर्तन सेवा यासह आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहे. यात २३ जानेवारी रोजी परम पूज्य गहिनीनाथ - महाराज औसेकर, २४जानेवारी रोजी परमपूज्य पद्मनाभ व्यास महाराज तेर २५ जानेवारी रोजी परमपूज्य महादेव महाराज चाकरवाडीकर २६ जानेवारी रोजी परमपूज्य डॉक्टर नारायण शास्त्री नागझरकर २७ जानेवारी रोजी ह भ प प्रसाद महाराज बडवे पंढरपूर २८ जानेवारी रोजी ह भ प अच्युत महाराज दस्तापुरकर २९ जानेवारी रोजी परमपूज्य गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन होत आहे.

या यज्ञ सोहळ्याला औसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील महाराष्ट्रातील भाविकांनी, या यज्ञसोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन वाशिष्ठ चतुरात्र सोमयाग सेवा समिती व सेलू ग्रामस्थ मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतची माहिती २० जानेवारी रोजी पत्रकार परिषदेतून देण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेला ॲडव्होकेट अरविंद कुलकर्णी, जनार्दन माने, संजय कुलकर्णी, प्रकाश पंडगे, मधुकर पंडगे, अरविंद विठ्ठल चामे, ज्ञानोबा पवार, रमेश पंडगे, गणेश प्रल्हाद जाधव, सुभाष माने, बालाजी कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतर्फे वार्तापलक उद्घाटन समारंभ व कामगार प्रबोधन मेळावा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : कामगारांच्या न्याय हक्कासाठी नोंदणीकृत संघटना आवश्यक आहे. राज्य व देशपातळीवर अनेक कामगार संघटना आहेत, परंतु या संघटना मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या मुलभूत प्रश्नाकडे लक्ष देत नाहीत, त्यामुळे आपल्या हिताचे संरक्षण करण्यासाठी आपल्या प्रश्नांची जान असणारी संघटना आवश्यक आहे, त्यामुळे मागासवर्गीय कर्मचारी यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारे , मागासवर्गीय कर्मचारी संघटन हे सामाजिक क्रांतीचे हत्यार आहे, आणि हे हत्यार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिले आहे, असे स्पष्ट मतं महावितरण मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. संजय घोडके यांनी व्यक्त केले,

काळेवाडी ता.पुरंदर येथील हॉटेल मयूर गार्डन येथील हॉलमध्ये महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा वार्तापलक बोर्ड उद्घाटन व कामगार प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बोलताना डॉ. संजय घोडके यांनी वरील मत व्यक्त केले,

यावेळी महावितरण मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे केंद्रीय उपसरचिटणीस किशोर अहिवळे, केंद्रीय उपाध्यक्ष पी. एल. जाधव केंद्रीय उपाध्यक्ष गणेश मुरकुटे , बारामती परिमंडळ अध्यक्ष कर्मचारी संघटनेचे नितीन दिड्डी उपाध्यक्ष श्रीधर कांबळे , सचिव प्रविण सरोदे, हे उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या धिवार, रिपब्लिकन पक्षाचे माजी अध्यक्ष नामदेव नेटके, बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे सचिव डॉ विनायक गायकवाड, भारतीय जनता पक्षाचे तालूका उपाध्यक्ष, अमोल जगताप, अठरापगड १२ बलुतेदार सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर, मंगेश गायकवाड, राहुलदादा भोंडे, समीर भिंगारदिवे, सामाजिक कार्यकर्ते सुधीर शेलार, अनिरुद्ध दोडके, आदी मान्यवर उपस्थित होते,

यावेळी बोलताना डॉ घोडके पुढे म्हणाले देशभरात आपल्या संघटनेचे साडेचार लाख सभासद आहेत, खाजगीकरणाला विरोध करणे, मागासवर्गीय कर्मचारी यांची पदोन्नती या बाबत इतर कर्मचारी संघटना आवाज उठवित नाहीत, त्यामुळे शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारधारेवर काम करणाऱ्या मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.संजय घोडके यांनी केले यावेळी विविध कर्मचारी उपस्थित होते,

कार्यक्रमाचे आयोजन पुरंदर तालुका मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे सासवड विभाग अध्यक्ष तानाजी हाब्बू सचिव सिध्देश्वर पहूरकर उपाध्यक्ष धीरजकुमार सातपुते, संघटक सागर चव्हाण, बारामती ग्रामीण मंडलचे अध्यक्ष राजेश साळुंखे, सचिव शाहिद शेख, सहसचिव नवनाथ ठोंबरे, संघटक वृषाली जाधव यांनी केले होते,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) दुचाकीच्या धडकेत दोन जण जखमी झाल्याची घटना १७ जानेवारी रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पोटफाडी चौक येथील बीजेपी कार्यालयासमोर घडली.याप्रकरणी विनायक सुरेश कय्यावाले (वय-२३,रा.महाराणा प्रताप,झोपडपट्टी,कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकी क्रमांक एमएच.१३.ईआर.७३२६ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व त्याचा मित्र गणेश असे दोघे जण होम मैदान येथून गड्डा यात्रा पाण्याकरिता जात असताना वरील ठिकाणी आले असता,वरील दुचाकी क्रमांकाच्या चालकाने भरधाव वेगाने दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या दोन्ही पायास गंभीर दुखापत केली.व फिर्यादी यांच्या मित्राच्या पायास किरकोळ जखम झाली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

# सोलापूर विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलींना केले पालकांच्या स्वाधीन

## बंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेसमधून प्रवास; अल्पवयीन मुलींचे रडणे व परिस्थितीचे गांभिर्य ओळखून केली सुटका




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ते मनमाड येथे (१२६२७) बेंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस या ट्रेनमध्ये कर्तव्यावर स्थित असणारे सोलापूर रेल्वे विभागातील टीटीआय श्री संतोष कुमार (प्रवासी तिकीट निरीक्षक) यांच्याकडे एक चिंतेत असणाऱ्या प्रवाश्याने संपर्क साधला आणि या एका घटनेमुळे अल्पवयीन मुलींना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. तर यात घडलेली घटना अशी कि , बेंगळुरू - नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस मध्ये दोन अल्पवयीन मुली रडत असून त्यांना जबरदस्तीने दिल्लीला नेण्यात येत असल्याचे एका प्रवाशाला समजले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सदरच्या प्रवाशाने तात्काळ श्री संतोष कुमार आणि श्री सूर्यवंशी, सीटीआय (मुख्य तिकीट निरीक्षक) अहमदनगर यांना घटना सांगितली.

पुढे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी तात्काळ आरपीएफ आणि नियंत्रण यांना सदरील घटनेची संपूर्ण वर्णनात्मक माहिती दिली. दरम्यान रेल्वे कर्मचाऱ्यांनी अधिक माहिती गोळा करण्यासाठी मुलींशी संवाद साधला आणि त्यांच्याशी ओळखीची पुष्टी करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला. पुढे सदरची ट्रेन बेलापूर स्थानकावर पोहोचल्यानंतर, पुढील तपास आणि आवश्यक कारवाईसाठी मुलींना आरपीएफकडे सुरक्षितपणे सोपवण्यात आले.

श्री संतोष कुमार आणि श्री सूर्यवंशी यांनी दाखवलेल्या समर्पणामुळे आणि अधिकाऱ्यांनी दिलेल्या जलद प्रतिसादामुळे मुलींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात रेल्वे प्रशासनाला यश आले. शिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाची वचनबद्धता देखील पुन्हा पटवून दिली.

सदरच्या घटनेत सोलापूर विभाग तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या धाडसी आणि सतर्कतेबद्दल सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक यांनी कौतुक केले.

# वाचन हे व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन : प्रा. गांगुर्डे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मानवी जीवनात ग्रंथ महत्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या वाचनाने माणूस घडतो. वाचन हे मानवी व्यक्तिमत्वाच्या विकासाचे प्रमुख आणि प्रभावी साधन आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना नियमित अभ्यासक्रमासोबतच अवांतर ग्रंथाचे वाचन करणे, नितांत आवश्यक आहे. अभ्यासक्रम तुम्हास नोकरी देईल मात्र वाचन तुम्हाला माणूस म्हणून घडवील; म्हणून वाचलं पाहिजे. असे प्रतिपादन कवी आणि ग्रंथालय प्रमुख प्रा. गुरुदेव गांगुर्डे यांनी केले.



के. के. वाघ महाविद्यालय रानवड येथे शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत सांस्कृतिक विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'लेखक वाचक संवाद' हा कार्यक्रम घेण्यात आला. तेव्हा प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे होते त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रंथ हा उत्तम गुरु असतो. ग्रंथ वाचनामुळे आपल्याला वेगवेगळ्या विषयांमधील ज्ञान संपादन करणे शक्य होते. कोणत्याही प्रकारचा ग्रंथ आपल्या अनुभवात भर टाकत असतो. त्यामुळे प्रत्येक व्कीने ग्रंथ वाचनाची आवड जोपासली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक समन्वयक डॉ. अरुण ठोके यांनी केले, सूत्रसंचालन ऋतुजा आहेर हिने तर आभार प्रा. भारती कुशारे यांनी मानले.

कार्यक्रमास आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. मिलींद पवार, प्रा. शीतल जगताप, प्रा. वैशाली शिंदे, डॉ. भावना पौळ, प्रा. निलेश आहेर, प्रा. पूजा वाढवणे, प्रा. श्वेता शहाणे, प्रा सुरभी दाणी, प्रा. जयश्री कापडी, प्रा.बाळकृष्ण फडे, प्रा. प्रकाश कडाळे, अनिल राजोळे, मुकुंद बागुल, सचिन काळे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येनं उपस्थित होते.

# पंढरपूर येथील गोविंद सबनीस यांना पक्ष मित्र जीवनगौरव पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील गोविंद स्वप्नील यांना पक्ष मित्र जीवन गौरव, पक्षी साहित्य पुरस्कार यांची घोषणा,

गेले चार दशके महाराष्ट्रात पक्षी विषयक कार्य करणारी संस्था महाराष्ट्र पश्चिम उत्तर तर्फे देण्यात येणाऱ्या २०२४ च्या पश्चिम मित्र पुरस्काराची घोषणा झाले असून यंदाचा पक्ष मित्र जीवन गौरव पुरस्कार पंढरपूरची गोविंद समनेश यांना जाहीर करण्यात आला.

महाराष्ट्र पक्षी मित्राच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला इतर पुरस्कारांपैकी पक्षी संवर्धन व सु सुशा पुरस्कार कर्नाटकच्या बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथील फिरोज चाऊस यांना, तर पक्षी जनजागृती पुरस्कार वर्ध्याची राहुल वखरे यांना जाहीर झाला पक्षी संशोधन पुरस्कारा या गटात योग्य प्रस्ताव प्राप्त न झाल्याने यंदा जाहीर करण्यात आला नाही.



यावर्षीपासून नव्याने पक्षी विषयक साहित्य पुरस्काराची घोषणा सुद्धा यावेळी करण्यात आली यावर्षीचा पहिला पक्षी साहित्य पुरस्कार परभणीतील माणिकपुरी यांना जाहीर झाला. पक्षी संबंधित विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र पक्षी मित्रा तर्फे २०१९ पासून यास पुरस्काराची सुरुवात करण्यात आली यामध्ये दरवर्षी चार पुरस्कार देण्यात येतात यावर्षीपासून यामध्ये साहित्य पुरस्काराची भर पडले आहे या पुरस्कारांची घोषणा महाराष्ट्र पश्चिमेक्रातर्फे अमरावती येथे संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर जयवंत वाडकर यांनी केली व पुरस्काराची वितरण शेगाव जिल्हा अहिल्यानगर येथे होणाऱ्या ३७ व्या महाराष्ट्र पश्चिम मित्र संमेलनात करण्यात येणार आहे.

# स्वयंशिस्तीने अपघात टाळता येतील : सुरेंद्र निकम




■ **इंदापूर महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रॅली व रक्तदानाचे आयोजन**

■ **सहभागी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त रस्ता सुरक्षेच्या घोषणा देऊन इंदापूर शहरवासीयांचे रॅलीच्या माध्यमातून लक्ष वेधून घेतले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे : कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय इंदापूर व बारामती आर.टी.ओ. विभाग आणि इंदापूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम व शहरात भव्य रॅली आणि रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

६०० विद्यार्थ्यांनी या अभियानामध्ये सहभाग नोंदवला. रक्तदान शिबिरात अनेक विध्यार्थी यांनी रक्तदान केले.

बारामती उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी सुरेंद्र निकम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,' रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे ब्रीदवाक्य ' परवाह' हे आहे. परवाह म्हणजे काळजी घेणे. रस्त्यावर वाहन चालवत असताना स्वतःची आणि इतरांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. स्वयंशिस्तीने अपघात टाळता येतील.'

इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक सुर्यकांत कोकणे म्हणाले की,' घराबाहेर पडल्यानंतर प्रत्येकाचा संबंध रस्त्याशी येतो . रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत आपणास सांगू इच्छितो की केवळ पोलीस प्रशासन व आरटीओ विभाग यांनी हे अभियान राबवून उपयोगाचे होणार नाही तर प्रत्येक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होऊन आपल्या घरातील व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रस्ता सुरक्षा संदर्भातील नियमांचे पालन करण्यासंदर्भात जागृती होणे आवश्यक आहे.

मोटार वाहन निरीक्षक पद्माकर भालेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की ,'युवकांनी रस्ता सुरक्षा संबंधी नियम पाळावेत. रस्ता अपघातामध्ये तरुणाचे प्रमाण जास्त आहे. गाडीची कागदपत्रे, विमा संबंधी जागरूक राहिले पाहिजेत.

अध्यक्षीय भाषणात इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे म्हणाले की,' आपल्या शरीरात रक्तवाहिन्या जे काम करतात तेच काम देशातील रस्ते करीत असतात. वाहनांचे आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याचे कार्य आरटीओ विभाग करीत असतो तर गाडी चालवणाऱ्यांचे आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याचे कार्य पोलीस प्रशासन करीत असते.

विद्या प्रतिष्ठान कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस. आर. देशपांडे म्हणाले की,' रस्ता सुरक्षा संबंधी रस्त्यावर चालणाऱ्या प्रत्येकाने इतरांचा आदर करावा. जसे की मोटार सायकल चालवणाऱ्यांनी सायकल चालवणाऱ्यांचा आणि मोटार चालवणाऱ्यांनी मोटरसायकलवाल्यांचा आदर करावा. आमचे महाविद्यालय पोलिस आणि आरटीओ विभागाला कायम सकारात्मक प्रतिसाद देते.

इंदापूर महाविद्यालयाचे प्रा. नामदेव पवार यांनी युवाशक्ती मोठी शक्ती आहे. या शक्तीने सकारात्मक पद्धतीने विचार करून रस्ता सुरक्षा संबंधीच्या नियमांचे तंतोतंत पालन करावे असे मत मांडले.

इंदापूर पोलिस स्टेशनचे पी एस आय श्री पवार, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रोहित भोसले , सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक तेजस मखरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर राऊत, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रशांत साठे तसेच राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी प्रा. दिनेश जगताप कनिष्ठ विभाग राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. सुवर्णा जाधव, प्रा.धनंजय माने, पॅथॉलॉजी विभागाच्या शितल शिंदे यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ.तानाजी कसबे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.उत्तम माने यांनी आभार मानले.

## घराचे कुलूप तोडून बेकायदेशीररित्या अतिक्रमण; तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) मः घराचे कुलूप तोडून बेकायदेशीररित्या अतिक्रमण करत दमदाटी केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ जून २०२३ ते आज अखेर न्यू सुनील नगर,एमआयडीसी येथे घडली. याप्रकरणी प्रकाश लक्ष्मण कमलापूरे (रा.कुचन नगर,सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून भंगरव्वा माळेकर (रा.मंगळवेढा), लक्ष्मी जाधव (रा.मंगळवेढा) व अबोली मंजी (रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. माहिती अशी की, २८ जून २०२३ ते आज अखेर न्यू सुनील नगर मधील जुना सर्वे नंबर १९१/२ यांसी नवीन सर्वे नंबर १८२/१/२/ यापैकी प्लॉट नंबर ७० येथे बाराशे स्क्वेअर फुट कच्चा बांधकाम असलेल्या जागेतील गाळ्यामध्ये ललिता सुरेश विटकर यांचे नातेवाईक वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या संमतीशिवाय गाळ्याचे व घराचे कुलूप तोडून बेकायदेशीर अतिक्रमण करून कब्जा केला आहे. तसेच त्यानंतर २५ ऑगस्ट २०२३ रोजी फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी सुनील नगर येथील गाळ्यात राहत असताना वरील संशयित तिघा जणांनी बेकायदेशीर अतिक्रमण करून फिर्यादी यांच्या पत्नीस मारहाण केली.तसेच रूम मधील भांडी व सर्व सामान बाहेर फेकून देऊन फिर्यादी व फिर्यादी यांच्या पत्नीस दमदाटी करून हाताला धरून गाळ्यातून बाहेर काढले.तसेच फिर्यादी यांच्या जागेतील स्टील पत्रे व वासे हे विकले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोसई.बनसुडे हे करीत आहेत.

## खेड भोसे येथील तंटामुक्ती समिती अध्यक्षाला घातला घेरावा

# संपूर्ण दारूबंदी करण्याच्या मागणीसाठी खेड भोसेगावातील महिला झाल्या आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गावातील अनेक दारू विक्री बंद व्हावी या मागणीसाठी महिलांनी वेळोवेळी आंदोलने केली पोलीस स्टेशनला तक्रारी आरोही दिले. तरीही गावात खुलेआम दारू विक्री सुरू असल्यामुळे वैतागलेल्या खेड भोसे गावातील महिलांनी दारूबंदीच्या मागणीसाठी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बंडू पवार यांना घ्यावा घालून गावातील अवैध दारू विक्री बंद व्हावी याची मागणी केली.

याबाबत अधिक माहिती अशी की पंढरपूर तालुक्यातील खेड भोसे गावामध्ये खुल्या अवैध दारू विक्री होत आहे याचा त्रास गावातील महिलांना मोठ्या प्रमाणात होत होता त्याच वैतागून महिलांनी करकंब पोलीस ठाणे उत्पादन शुल्क विभाग पंढरपूर तहसीलदार सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते व निवेदन दिल्या नंतर काही दिवस गावातील दारूबंदी बंद झाली.




मात्र सध्या गावात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून गावामध्ये सातत्याने भांडण तंटा होत आहे याबाबत ग्रामपंचायत ने दारूबंदी व्हावी यासाठी ठराव सुद्धा केला आहे तरीसुद्धा गावातील दारू विक्री बंद नसल्याने वैतागलेल्या महिलांनी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बोर्ड पवार यांना देरावा घालून दारूबंदी बंद करण्याची मागणी केली.

# टाकळीवाडी येथील शिवकालीन बुरुज संवर्धनासाठी तहसीलदार अनिल हेळकर यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिराळ येथील शिवकालीन बुरुज संवर्धनासाठी तसेच भोवती असलेल्या अतिक्रमण काढण्यासाठी शिरोळ तहसीलदार अनिल हेळकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

छत्रपती ग्रुप या पाठपुरासाठी पुढाकार घेतलेला आहे. लवकरात लवकर बुरुजाची डागडुजी करावी असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी शिवभक्त हजर होते.



## थोडक्यात...




### देवकार्यात झालेल्या वादावरून लाकडी बांबूने मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मागील सहा महिन्यापूर्वी झालेल्या देवकार्यात झालेल्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण करून कन्नड भाषेत शिवीगाळ करत दमदाटी केली. तसेच लाकडी बांबूने मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ जानेवारी रोजी रात्री साडेदहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास होम मैदान येथे घडली. याप्रकरणी लखन सिद्धपा इंचगेरी (वय-३२,रा.अशोक चौक,चिप्पा मार्केट जवळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून विशाल कानमूर्ती, गोविंद बत्तुल, कार्तिक देशमुख,प्रेम दीपक अडसुळे (सर्व.रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार माडे हे करीत आहेत.

### डिव्हायडरला धडकून दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

सोलापूर, (प्रतिनिधी) : डिव्हायडरला धडकून एका दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना हत्तुरे वस्ती ते आसरा चौक दरम्यान घडली. श्रीकांत सायबण्णा न्हावी (वय-३२,रा.टिकेकरवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाणे येथील पोलीस हेडकॉन्स्टेबल बहिर्जे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीकांत न्हावी हा ७ जानेवारी रोजी हत्तुरे वस्ती ते आसराकडे भरधाव निघाला होता.त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने उदय इंटरप्राईजेस होटगी रोड येथील डिव्हायडरच्या मधोमध जाऊन धडकला. त्यात गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पुढील तपास पोह. गायकवाड हे करीत आहेत.

# उल्हासनगर महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त यांनी केली एमएमआरडीएद्धारे सुरु असलेल्या रस्त्यांची पाहणी

## साफसफाई, स्वच्छता न झाल्यास शिस्तभंगाची होणार कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : दिनांक २०.०१.२०२५ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त मॅडम यांनी एम. एम. आर. डी. ए. द्वारे सुरु असलेल्या ०७ रस्त्यांची, गोल मैदान येथील प्रस्तावीत क्रिडा संकुल व व्हि.टी.सी. ग्राउंड येथील बाळासाहेब ठाकरे मेमोरीयल क्रिडा संकुलाची व मनपा कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी पाहणी केली.

१. उल्हासनगर -०४ येथील नेताजी चौक ते कैलास कॉलनी, कुर्ला कॅम्प मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

२. उल्हासनगर -०५ येथील न्यू इंग्लिश हाई स्कूल ते लालचक्की, पेट्रोलपंप आणि हील लाईन पोलिस स्टेशन मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

३. उल्हासनगर ०१, येथील ए - ब्लॉक ते साईबाबा मंदिर, डॉल्फिन क्लब आणि सेंच्युरी ग्राउंड मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

४. उल्हासनगर -०४ येथील सोनार चौक ते कोयांडे, शारदा कॅस्टल मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

५. उल्हासनगर -०३ येथील हिरा घाट मंदिर ते डर्बी हॉटेल, समर्पण अपार्टमेंट मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

६. उल्हासनगर -०३ येथील शामा प्रसाद मुखर्जी चौक ते शांतीनगर, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

७. उल्हासनगर -०४ येथील वॉक्को कंपाऊंड ते विनस चौक वी. टी. सी. ग्राउंड मार्गे येथे सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे.

सदर ठिकाणी पाहणी करतेवेळी अति. आयुक्त किशोर गवस, शहर अभियंता (साबांवि) तरुण सेवकानी, कार्यकारी अभियंता, (पापुवि) श्री. परमेश्वर बुडगे, कनिष्ट अभियंता श्री. हर्षद प्रधान, (साबांवि), तसेच जनसंपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे आणि इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सदर पाहणीअंती मा. प्रशासक तथा आयुक्त महोदया यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहे आहेत

१. उल्हासनगर १, गोल मैदान येथील प्रस्तावित कामाचे प्रकल्प नकाशे व संपूर्ण कामाचे उमपा नियुक्त सलागार यांच्या द्वारे सादरीकरण करावे.-CE(pwd)

२. एम.एम.आर.डी.ए. द्वारे सुरु असलेल्या ०७ रस्त्यांची कामे जलद गतीने होण्याकरिता एमएमआरडीए वर अवलंबून न राहता त्यांचे कडून होत असलेल्या सदर कामाच्या भौतिक प्रगतीची CE (pwd), EE (पापु ) यांनी दैनंदिन पाहणी करावी. स्थळ पाहणीचे फोटो काढून आपापल्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवावेत. महानगरपालिकेच्या कामामुळे (उदा.road marking मधील अतिक्रमण हटवणे, झाडे कापणे, ड्रेनेज पाईप्स, इत्यादी अनुषंगिक कामे) चचठऊचे काम थांबले असेल तर ते संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित पुर्ण करावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी MMRDA प्राधिकरणाकडून रस्त्यांचे व्यवस्थीतरित्या बेरेकेटीग करणे, व सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी कामाचे नाव, संबंधीत विभाग, कामाची प्राकलनीय रक्कम, ठेकेदाराच्या नाव, संपर्क क्र. दर्शविणारे फळक लावणे इत्यादी कामे त्वरित पूर्ण करावीत. अतिरिक्त आयुक्त यांनी वरील सर्व बाबींवर देखरेख, नियंत्रण करून सर्व कामे लवकरात लवकर होईल हे पहावे.



३. एम.एम.आर.डी.ए. अधिकारी संबंधीत ठेकेदारसह उमपा मुख्यालयात संयुक्त बैठक गुरुवारी आयोजित करावी.

४. संबंधीत प्रभाग अधिकारी (सहाय्यक आयुक्त) यांनी वाहतूक पोलिसांची संपर्क साधून रस्त्यावर अनधिकृतरित्या उभ्या करण्यात आलेल्या वाहनांवर, अनधिकृत फेरीवाल्यांवर त्वरित कारवाई करावी. कारवाई मध्ये सातत्य ठेवावे.

५) उल्हासनगर ४, व्ही.टी.सी. ग्राउंड येथील हॉ. बाळासाहेब ठाकरे मेमोरियल क्रिडा संकुल या प्रकल्पाचे काम बंद असल्याने संबंधित ठेकेदारास नोटीस बजावण्यात यावी-CE(pwd)

६) पाहणी दरम्यान १) गोल मैदान परिसर २) व्ही. टी. सी. ग्राउंड रोड ३) स्वर्गद्वार स्मशानभूमी या ठिकाणी कचरा दिसून आल्यामुळे संबंधित स्वच्छ्ता निरीक्षक ह्यांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत.

शहरात दैनंदिन साफसफाई/ स्वच्छतेची कामे झाली नाहीत तर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# गावातील शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते विशेष मोहिमे अंतर्गत खुले होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा उपविभागातील तालुक्यामधील सर्व गावामध्ये शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते कालबद्धरितीने खुले करण्यासाठी जिल्हा महसूल प्रशासनाने २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे त्यानुसार सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे.

या कालबद्ध कार्यक्रमानुसार...

पहिल्या टप्प्यात दि २० ते २४ जानेवारीपर्यंत संबंधित गावच्या तलाठी यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडुन ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग नमूद असलेले गाव नकाशे प्राप्त करुन घेणे.

दुसऱ्या टप्प्यात दि. २५ ते ३१ जानेवारी पर्यंत या नकाशातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग हे प्रत्यक्ष भेट देऊन त्यातील बंद असलेल्या रस्त्याची यादी तयार करणे.

तिसऱ्या टप्प्यात दि. १ ते ७ फेब्रुवारीपर्यंत बंद असलेले रस्ते ज्या भुमापन क्रमांकातून जातात त्यांचे भोगवटाधारकांची यादी तयार करणे.

चौथ्या टप्प्यात दि. ८ ते १५ फेब्रुवारीपर्यंत भोगवटाधारक व गावातील सरपंच व इतर सहधारक यांची सदर रस्ता खुला करण्याबाबत बैठक आयोजित करुन समन्वयाने व सर्वसहमतीने रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार तहसिलदार यांच्याकडे दाखल असलेल्या प्रकरणात सर्व पक्षकार गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सरपंच, ग्राम सेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषि सेवक यांच्या समवेत त्या त्या वादग्रस्त ठिकाणी स्थळ निरीक्षण करुन बैठक घेऊन संपवुन सर्व सहमतीने रस्ता खुला करण्यासाठी व दावा निकाली काढण्यासाठी लोकअदालतीच्या निकषानुसार प्रकरणात निर्णय घेणे.

पाचव्या टप्प्यात दि. १६ ते २८ फेब्रुवारीपर्यंत चौथ्या टप्प्यातील प्रयत्नातून रस्ता खुला होत नसल्यास उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या सहाय्याने रस्ता निश्चित करुन पोलिसांचे सहाय्याने तो खुला करणे.

या कालबद्ध कार्यक्रमाच्या अंतिम टप्यात दि. १ ते ३१ मार्चपर्यंत पाचव्या टप्प्यानुसार रस्ता खुला न झालेल्या प्रकरणांमध्ये मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज प्राप्त करुन घेऊन उचित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

या कालबद्ध कार्यक्रमाच्या अनुषंगाने सिंदखेडराजा उपविभागातील तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख व पोलीस निरीक्षक यांनी समन्वयाने कामकाज करून ग्रामीण भागातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब) पायमार्ग कालबद्धरितीने खुले करावे, असे आदेश उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी दिले.

# अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या महिला ऊसतोडणी कामगारांना डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून साडी व स्वेटरचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी : अकोले तालुक्यातील अगस्ती सहकारी साखर कारखान्यात महिला ऊसतोडणी कामगारांसाठी साडी व स्वेटर वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कामगारांच्या कष्टाला सलाम करत त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव नाईकवाडी यांनी हजेरी लावली. या मान्यवरांच्या हस्ते ऊसतोडणी महिला कामगारांना साडी व स्वेटरचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजनात कारखान्याचे कार्यकारी संचालक सुधीर कापडणीस तसेच शेतकी व ऊस अधिकारी सोमनाथ देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यासोबतच कारखान्यातील इतर गटांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्तेही उपस्थित होते. यामध्ये इंदोरी संचित नवले, गट फेडमन पांडुरंग आरोटे, सोमनाथ आरज, मयूर आरोटे, भिमाशंकर घुले, रमाकांत आग्रे, नवनाथ तिटमे, आणि प्रविण आवारी यांचा समावेश होता.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात ऊसतोडणी कामगारांच्या अथक परिश्रमांना आदरपूर्वक उजाळा दिला आणि त्यांचे हक्क व कल्याणासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. शिवाजीराव नाईकवाडी यांनी ऊसतोडणी कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी कारखान्याने उचललेले पाऊल अभिनंदनीय असल्याचे सांगत अशा कार्यक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले. या उपक्रमात महिला ऊसतोडणी कामगारांना साडी आणि स्वेटरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. उपस्थितांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सामाजिक जबाबदारीचे कौतुक केले आणि असे उपक्रम भविष्यातही राबवण्याची अपेक्षा व्यक्त केली. हा कार्यक्रम कामगारांसाठी प्रेरणादायी आणि सुखद अनुभव ठरला.

# १० वर्षांच्या तनुजाने बीए स्पोर्ट्स चॅम्पियनशिप सिरीजमध्ये दाखवली बॅटिंगमध्ये तिची प्रतिभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : दिनांक १७ ते १९ जानेवारी दरम्यान पुणे येथील बी ए स्पोर्ट्स ग्राउंड ,दापोडी येथे पार पडलेल्या अकरा वर्षाखालील मुलांच्या २० षटकाच्या लेदर बॉल क्रिकेटच्या टूर्नामेंट मध्ये आलेगाव ,दक्षिण सोलापूर येथील तनुजा माळी वयवर्ष १० हिने अतिशय उत्कृष्ट बॅटिंगचे प्रदर्शन करून मालिकावीर व तीन सामनावीरचे पुरस्कार मिळवले. तनुजाने तीन सामन्यांमध्ये बॅटिंग करत २१० धावा पटवल्या.

तनुजा ही बीअ स्पोर्ट सी संघाकडून खेळून अंतिम सामन्यात तनुजाने बीअ स्पोर्ट ए संघाविरुद्धमे ५७ चेंडूमध्ये ८९ धावा काढल्या व ती नॉट आउट राहिली.




पहिल्या लीग मॅच मध्ये तनुजाने बीअ स्पोर्ट बी संघविरुद्ध ४३ चेंडूमध्ये ६५ धावा काढल्या व सामनावीराचा पुरस्कार मिळवला.

दुसऱ्या लीग मॅच मध्ये तनुजाने बीअ स्पोर्ट डी संघाविरुद्ध ३२ चेंडूमध्ये ५६ धावा काढल्या व सामनावीराचा पुरस्कार मिळवला.

तनुजाला दिल्ली येथील शिवानी गुप्ता यांचे प्रशिक्षण लाभले. व बीडीएम कंपनीकडून स्पॉन्सरशिप सुद्धा मिळाली आहे. मांजरी येतील कोच शाहिद रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली खेळत आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## आत्महत्या केल्यापेक्षा शेतकऱ्याच्या न्याय हक्कासाठी लढा उभा करून हौतात्म्य पत्करेन : कैलास नागरे

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

# महाराष्ट्र शासन पुरस्कृत सन्मानित शेतकरी कैलास नागरे यांचा पुन्हा एकदा अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा तालुक्यातील शिवणी आरमाळ येथील शेतकरी कैलास नागरे सह शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषिप्रधान शेतकऱ्यांची नवीन पिढी जर निर्माण करायची असेल तर अर्जदार शेतकऱ्यांच्या दिनांक १० ऑक्टोंबर २०२४ व दिनांक २ डिसेंबर २०२४ आणि ९ डिसेंबर २०२४ च्या निवेदनात पंचक्रोशितील जीवसृष्टी वाचवण्यासाठी पर्यावरण साखळी अबाधित राहण्यासाठी दुष्काळग्रस्त



पंचक्रोशित हमी पाणी देण्यासाठी आणि शेतकरी हितावह केलेल्या मागण्या प्रमाणे आणि प्रशासनाने दिलेल्या २० डिसेंबर २०२४ लेखी पत्राप्रमाने युद्ध पातळीवर ध्येय धोरणे आखून त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी बाबत अर्जदाराने १० ऑक्टोबर २०२४ तसेच २ डिसेंबर २०२४ आणि ९ डिसेंबर २०२४ च्या निवेदनात मागण्या प्रमाणे १४ डिसेंबर पर्यंत पूर्ण न झाल्यामुळे अन्नत्याग आमरण उपोषणाचा इशारा देऊनही त्या सबंधित मागण्या वेळेत पूर्ण न झाल्या मुळे अर्जदाराला दिनांक १५ डिसेंबर २०२४ पासून अन्नत्याग आमरण उपोषण २० डिसेंबर २०२४ पर्यंत करून ही दिनांक २० डिसेंबर २०२४ ला आपल्या सबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या लेखी विनंती चां मान ठेवत मी माझ्या पंचक्रोशीच्या शेतकरी हितावह मागण्याची अंमलबजावणी होई पर्यंत अन्नत्याग आमरण उपोषण तूर्तास स्थगित केले होते. पण प्रशासन अर्जदार शेतकऱ्यासोबत फक्त पत्रव्यवहार करत आहे आहे परंतु शेतकरी हितावह मागण्या संदर्भात तात्काळ कुठलेच ध्येय धोरणे आखून अंमलबजावणी करत नाही म्हणून पंचक्रोशितील सबंधित गावांच्या धरणे तुडुंब भरून हमी पाणी देण्यासाठी शेतकरी हितावह पर्यावरण साखळी अबाधित राहण्यासाठी आणि जीवसृष्टी वाचवण्यासाठी जमिनीचां ऱ्हास वाचवण्यासाठी मागण्या मान्य करतो असे सबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी लेखी पत्र देऊनही पूर्ण होत नसेल तर मी शेतकरी पुत्र नसूनही शेतकरी पुत्र निर्माण व्हावे ही अभिलाषा बाळगणारा महाराष्ट्र शासन पुरस्कृत सन्मानित युवा शेतकरी म्हणून माझ्या जगण्याला अर्थ नाही असे समजतो. शेतकरी आत्महत्येचा ठप्पा लाऊन घेतल्या पेक्षा अर्जदार शेतकरी कैलास नागरे शेतकऱ्याच्या न्याय हक्कासाठी लढा उभा करून हौतात्म्य पत्कारेल. करिता आपण तात्काळ त्यांना वरील नमूद तारखेंच्या निवेदनाच्या अनुषंगाने उद्धपातळीवर ध्येय धोरणे आखून अंमलबजावणी करावी अन्यथा अर्जदार कैलास नागरे कृषिप्रधान भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिना पासून दिनांक २६ जानेवारी २०२५ पासून शिवणी आरमाळ च्या लघुप्रक्लप क्षेत्रातील भिंतीजवळ बसून अन्नत्याग आमरण उपोषणाला त्यांच्या मागण्यां संदर्भात अंमलबजावणी होई पर्यंत बसेल.येणाऱ्या दिनांक २५ जानेवारी २०२५ च्या आत करावी अन्यथा अर्जदार शेतकरी सर्व सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध असून सुद्धा पाण्यापासून वंचित असणारा सिंचनापासून उद्विग्न झालेला कृषिप्रधान भारतातील महाराष्ट्र शासन पुरस्कृत सन्मानित युवा अर्जदार कैलास नागरे यांनी प्रशासनाला पाचव्यांदा निवेदन सादर करीत आहे.राज्य सरकारने शेतकरी हिताचे निर्णय कृपया लवकरात लवकर घ्यावे जर शेतकरी हिताचे निर्णय पुढील ६ दिवसात घेतले नाही तर ते शिवणी आरमाळ च्या लघुप्रक्लप क्षेत्रात लघुप्रकल्पाच्या भिंतीजवळ बसून अन्नत्याग आमरण उपोषण करेल आणि जर शासनाने त्यांना या लघुप्रक्लप क्षेत्रात आमरण उपोषण करण्यास परवानगी नाकारली तर ते या लघु प्रकल्पाच्या विश्राम गृहाच्या गेट समोर अन्नत्याग आमरण उपोषण करेल निवेदनाचा गांभीर्यपूर्वक विचार झाला नाही तर ६ दिवसानंतर २६ जानेवारी २०२५ पासून शेतकरी कैलास नागरे यांनी अन्नत्याग आमरण उपोषणाचा इशारा निवेदनाद्वारे तहसीलदार मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.